# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **10/01/2022**

**Brief of the work done :-**

पोलिस स्टेशन मालेगाव हद्दीतील नागरतास येथील जगदंबा देवी मंदिरातील देवीचा मुकुट व गळ्यातील दागिने चोरीची घटना दि.19 डिसेंबर रोजी घडली होती. आरोपी कडून चांदीचा मुकुट, गळ्यातील मंगळसूत्र व पोथ हस्तगत करण्यात आली आहे.

लोकमत

पोलिसांनी लावला छडा

## मालेगावच्या हल्ला प्रकरणातील आरोपीच निघाले नागरतास संस्थानमधील मुकुटाचे चोरटे

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजुरा** : मालेगाव तालुक्यातील नागरतास येथील श्री जगदांबा देवी संस्थांमधील चोरी प्रकरणाचा मालेगाव पोलिसांनी छडा लावला असून अटकेत असलेल्या चोरट्यांकडून चोरी गेलेला चांदीच्या मुकुटासह मुद्देमाल हस्तगत करण्यात आला, अशी माहिती तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक जी.एम तडसे यांनी दिली. मालेगावच्या ज्वेलर्स हल्ला प्रकरणातील आरोपींनीच नागरतास संस्थांमधील मुकुटासह अन्य साहित्य लंपास केल्याचे तपासातून निष्पन्न झाले.

मालेगाव तालुक्यातील नागरतास येथील जगदंबा देवी संस्थानमधील देवीच्या डोक्यावरील चांदीच्या मुकुटासह इतर वस्तू चोरीला गेल्याची घटना १९ डिसेंबरच्या रात्री दरम्यान घडली होती. याबाबतची तक्रार गजानन ग्यानुजी देवळे यांनी मालेगाव पोलिसात दिली होती. प्रकरण तपासात असतानाच २१ डिसेंबर रोजी मालेगाव येथील अंजनकर ज्वेलर्सचे मालक योगेश अंजनकर व त्याचा नोकर रवी वाळेकर यांचेवर प्राणघातक हल्ला करून त्यामध्ये एका जणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणातील मुख्य आरोपी अजबराव घुगे, दुसरा मुख्य आरोपी हसन सलीम खाटीक, यासह दिनेश किरण निरापुरे, संतोष दत्तात्रय माने व इतर एका आरोपींना ताब्यात घेतले. तपासा दरम्यान पोलिसांनी अधिक चौकशी केली असता वरील नमूद आरोपींनी नागरतास येथील जगदंबा देवी संस्थानमधील चोरीचा गुन्हा केल्याची पोलिसांना कबुली दिली.

### नकली दागिण्यावरच हात साफ

या घटनेत चोरट्यांनी मुकुटासह लंपास केलेल्या मंगळसुत्र व पोतमध्ये केवळ मुकुटच चांदीचा दागिना असून मंगळसूत्र व पोत हे नकली दागिणे असल्याची माहिती तपास अधिकाऱ्यांनी दिल्याने चोरट्यांनी अधिकाधिक नकली दागिण्यावरच हात साफ केल्याचे तपासातून उघड झाले.



### चांदीच्या मुकुटासह मुद्देमाल हस्तगत

आरोपीकडून राजुरा ते रिधोरा मार्गावरील नदीपात्रात दडवुन ठेवलेला देवीच्या डोक्यावर चांदीचा मुकुट, गळ्यातील पोथ व मंगळसूत्र हस्तगत करण्यात पोलिसांना यश आल्याची माहिती तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक जी.एम. तडसे यांनी दिली. या गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अप्पर पोलीस अधीक्षक भामरे, उपविभागीय पोलिस अधिकारी पुजारी, स्थानिक गुन्हे शाखा वाशिमचे पोलीस निरीक्षक जाधव व मालेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रवीण धुमाळ यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक जी.एम.तडसे, जमादार गणेश बियाणी यांनी केला.

Hello Washim
Page No. 2 Jan 10, 2022
Powered by: erelego.com